# महाराष्ट्र विधानमंडळ

## सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.८ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१२-२०१३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.११ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०११ - २०१२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.७ व " एमएसईबी सूत्रधारी कंपनी " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.८ यावरील समितीचा**

# सहावा अहवाल

(दिनांक १६ डिसेंबर २०१५ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई / नागपूर.

[किंमत : २४.०० रुपये]

# सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.८ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१२-२०१३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.११ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०११-२०१२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.७ व " एमएसईबी सूत्रधारी कंपनी " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.८ यावरील समितीचा

## सहावा अहवाल

एचबी १५३४—१

## सार्वजनिक उपक्रम समिती

### (२०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

**सदस्य**

* (२) रिक्त
(३) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.
(४) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(५) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(६) ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.
(७) श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.
(८) श्री. अमित साटम, वि.स.स.
(९) श्री. राजन साळवी, वि.स.स.
(१०) श्री. हर्षवर्धन जाधव, वि.स.स.
(११) श्री. सुनिल राऊत, वि.स.स.
(१२) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.
(१३) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(१४) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.
(१५) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१६) श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.
(१७) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स
(१८) श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स
(१९) श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.
(२०) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(२१) ॲड. अनिल परब, वि.प.स.
(२२) श्री. किरण पावसकर, वि.प.स.
(२३) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.
(२४) श्री. अनंत गाडगीळ, वि.प.स.
(२५) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. राजेश तारवी, उप सचिव,

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,

श्री. प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती),

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

* ॲड. राज पुरोहित, वि.स.स. यांनी दिनक २६ ऑगस्ट २०१५ रोजी सार्वजनिक उपक्रम समिती वरील सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | (सात) |
| **एक** | **" महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित "**<br>**(लेखा परीक्षा अहवाल २०१०-२०११)**<br>(१) आदेशांचे विभाजन<br>(परिच्छेद क्रमांक ३.८) | १ |
| **दोन** | **" महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित "**<br>**(लेखा परीक्षा अहवाल २०१२-२०१३)**<br>(२) पुरवठादाराला अदेय फायदा<br>(परिच्छेद क्रमांक ४.११) | ६ |
| **तीन** | **" महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित "**<br>**(लेखा परीक्षा अहवाल २०११-२०१२)**<br>(३) टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च<br>(परिच्छेद क्रमांक ३.७) | ११ |
| **चार** | **" एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादित "**<br>**(लेखा परीक्षा अहवाल २०११-२०१२)**<br>(४) टाळता येण्याजोगे व्याज<br>(परिच्छेद क्रमांक ३.८) | १७ |
| **पाच** | **बैठकीचे परिशिष्ट** | २१ |

## प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.८ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१२-२०१३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्र. ४.११ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०११-२०१२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.७ व " एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.८ यावरील समितीचा सहावा अहवाल (तेरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

" महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, श्री. मुकेश खुल्लर तसेच " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री.बिपीन श्रीमाळी यांची समितीने दिनांक १२ ऑगस्ट २०१५ व दिनांक २४ जून,२०१५ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, श्री. मुकेश खुल्लर तसेच " महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री.ओ.पी. गुप्ता यांची समितीने दिनांक १ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" एमएसईबी सुत्रधारी कंपनी मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, श्री. मुकेश खुल्लर तसेच " एमएसईबी सुत्रधारी कंपनी मर्यादितचे " संचालक (वित्त), श्रीमती अनुराधा भाटिया यांची समितीने दिनांक १ सप्टेंबर २०१५ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार (लेखा III), श्री. रविकिरण उबाळे, उप महालेखाकार तसेच श्री.एस.व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी (वाणिज्यिक लेखा परिक्षक) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, श्री. मुकेश खुल्लर तसेच " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. बिपीन श्रीमाळी तसेच " महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. ओ.पी. गुप्ता तसेच " एमएसईबी सुत्रधारी कंपनी मर्यादितचे " संचालक (वित्त), श्रीमती अनुराधा भाटिया यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २४ नोव्हेंबर २०१५.

**डॉ. सुनिल देशमुख,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

## “ महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ”

### (सन- २०१०-२०११)

**एक - आदेशांचे विभाजन :— (वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी टाळण्यासाठी सप्टेंबर, २००८ ते फेब्रुवारी, २००९ मध्ये आदेशांच्या विभाजनांमध्ये पारदर्शकतेचा अभाव होता.)**

**१.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-११ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.८ मध्ये “ आदेशांचे विभाजन ” या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र राज्य ऊर्जा निर्मिती कंपनी मर्यादित (कंपनी) च्या अधिकारांच्या प्रत्यायोजने प्रमाणे, उप मुख्य लेखा अधिकारी यांच्याशी विचार विनिमय करुन विद्युत निर्मिती केंद्राच्या मुख्य महाव्यवस्थापकांना (सीजीएम) नित्याचे काम करण्यासाठी रु. तीन लाख आणि विशेष दुरुस्तीच्या कामासाठी रु. १५ लाख खर्च करण्याचे अधिकार आहेत. सन २००८-०९ मध्ये सीजीएमने रु. ९.१५ कोटी किमतीच्या नागरी बांधकामाचे एकूण २३८ कार्याचे आदेश निर्गमित केले. आमच्या असे निदर्शनास आले की, औपचारिक निविदा प्रक्रियेशिवाय ही कामे कोटेशन तत्वावर प्रदान केली होती. एकाच कंत्राटदाराला एकाच तारखेला, एकाच प्रकारच्या कामाचे दोन ते पाच कार्य आदेश निर्गमित केले गेले, जे असमर्थनीय आहे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी टाळण्यासाठी संयुक्त कामाचे विभाजन केले आहे असे दर्शविते जे वित्तीय औचित्याच्या सुत्रांचे उल्लंघन करणारे आहे. तपशीलवार परिक्षण केल्यावर असे दिसून आले की, नित्याच्या कामासाठी *आठ कंत्राटदारांना रु. २.४६ कोटी मुल्याचे ६२ कार्याचे आदेश निर्गमित केले (सप्टेंबर,२००८ ते फेब्रुवारी,२००९) त्याचा तपशील जोडपत्र-९ मध्ये खालीलप्रमाणे आहे. व्यवस्थापनाने लेखापरीक्षणाचा दावा मान्य (ऑक्टोबर,२०११) केला आणि असे नमूद केले की, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना योग्य सूचना करण्यात आल्या आहेत. पुढे असेही नमूद केले की, या प्रकरणाचा तपास करण्यासाठी चौकशी सुरू केली आहे. ही बाब शासनाला कळविण्यात (मार्च,२०११) आली होती, त्याचे उत्तर प्रलंबित होते (नोव्हेंबर,२०११).

**१.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, या कार्यालयाने महाराष्ट्र शासनास कार्यपुर्ततेचा अहवाल पत्र क्र.सी.जी.एम. (आय/ए)/परफार्मन्स ऑडीट/सी.ए.जी./२००५-१०/०४६४ दिनांक २१ ऑक्टोबर २०११ या नुसार पाठविले आहे. त्यात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखापरीक्षक (ए.जी.) यांच्या अभिप्रायानुसार महानिर्मिती कंपनीचे मुख्य अभियंता वायू औ.वि.नि.केंद्र, उरण यांनी प्रारंभिक चौकशी केली. त्यासाठी चार सदस्यांच्या एका चौकशी समितीची रचना करण्यात आली होती. या समितीने सदर प्रकरणाची तपासणी केली तसेच सर्व अभिलेखांची पडताळणी केली व पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या :—

(१) कोणतेही आरोप होऊ नये यासाठी या सारख्या कामाचे एकात्मिकीकरण भविष्यात करण्यात येईल. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यात येईल. नेहमीच्या कामांसाठी म्हणजे स्वच्छता, नित्य

* चेतन आर. पाटील तीन कामे रु. ७.१७ लाख, सी. बी. पाटील पाच कामे रु. १४.९५ लाख, एम. जे. पाटील पाच कामे रु. १४.६२ लाख, आर. एस. मुंबईकर नऊ कामे रु. २४.९० लाख, एस. एस. इंजिनिअरींग वर्क्स आठ कामे रु. २३.९२ लाख, सदानंद ईंजिनिअरींग वर्क्स बारा कामे रु. ३५.८८ लाख, रोशन ट्रेडींग कंपनी चार कामे रु. ५५.९० लाख आणि एस. जी. राठोड अॅन्ड कंपनी सोळा कामे रु. ६८.६७ लाख.

देखभाल इ. यासारख्या कामांसाठी निविदा आवश्यकतेप्रमाणे काढण्यात येतील, स्थानिक कंत्राटदार/प्रकल्पग्रस्त व्यक्ती (PAPs) यांना प्राधान्य दिले जाईल.

(२) अशा प्रकाराची पुनरावृत्ती टाळण्यात यावी अशा आशयाची इशारा पत्रे संबधितांना देण्यात आली आहेत.

(३) स्थानिक वित्त व लेखा यांचे काम करणाऱ्या व्यक्ती प्रकरणाची दक्षतापूर्वक छाननी/लेखापरीक्षण करतील व त्यातील अनियमितता तात्काळ उच्च प्राधिकाऱ्यांच्या नजरेस आणतील.

(४) " जेथे व जशी गरज आहे त्या प्रमाणे या तत्वावर कामे " स्थानिक कंत्राटदार/प्रकल्पग्रस्त व्यक्ती यांना देण्यात येतील व भविष्यात स्थानिक असंतोष टाळण्यात येईल. सदर समितीच्या शिफारशीनंतर, मुख्य अभियंता, वायू औष्णिक वीज निर्मिती केंद्र, उरण यांनी संबंधितांना इशारा पत्रे दिली तसेच भविष्यात अशा विसंगती टाळण्यासाठी एक परिपत्रक क्र. १५६८, दि. ११ मे २०११ सुद्धा वितरित केले आणि सक्षम प्राधिकारी, म्हणजे मा.व्यवस्थापकीय संचालक यांना कार्यालयीन टिपणी क्र.सी.ई./वर्क्स/गव्हर्नमेंट ऑडीट/७४४, दि. १२ सप्टेंबर २०११ यानुसार सदर प्रकरणी कार्योत्तर मंजुरी देण्याची विनंती करणारा प्रस्ताव सादर केला. सक्षम प्राधिकारी, म्हणजे मा. व्यवस्थापकीय संचालक यांना मा.संचालक (संचलन) आणि मा.संचालक (वित्त) यांच्याशी चर्चा करुन मंजुरी दिली व पुढील प्रमाणे अभिप्राय दिला. " परळी प्रकल्पात यासारख्या प्रकरणावर शिस्तभंगाची कारवाई केली होती, तशीच शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. "

याशिवाय सदर प्रस्ताव कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचेकडे दोषी व्यक्तीवर गंभीर कारवाई व्हावी यासाठी चौकशी सुरू करण्यासाठी व महानिर्मिती कंपनीच्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या पर्यंत कडक शिस्तीचा संदेश पोहोचला जावा यासाठी पाठविण्यात आला. महानिर्मिती कंपनीच्या प्राधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे व भविष्यात अशा प्रकारची घटना घडू नये म्हणून कडक कारवाई करण्याचा प्रस्ताव सूचविला आहे. महानिर्मिती कंपनीने मुख्यालयातर्फे संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना आरोप पत्रक पत्र क्र.जी.टी.पी. एस./जी डब्ल्यू/कॉन्फ/१५६९ आणि १५७०, दि. ११ मे २०११ यानुसार दिलेले आहे आणि आता चौकशीची प्रक्रिया सुरु आहे. अंतीम निष्कर्ष अद्याप निघायचा आहे. त्याची माहिती लवकरच देण्यात येईल.

**१.३** याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, कंपनीच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**१.४** समितीला ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १२ ऑगस्ट २०१५ रोजी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद

क्र. ३.८ " आदेशाचे विभाजन " याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली की, याबाबत विभागाने अनेक परिपत्रके काढलेली आहेत. अनेक दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध सक्त कारवाईचे आदेश काढलेले आहेत. परंतु अद्यापही या प्रकरणात नेमके काय घडले आहे यासंदर्भात सविस्तर माहिती द्यावी व खुलासा करावा.

यावर महानिर्मितीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी असा खुलासा केला की, सन २०१०-२०११ मध्ये सदरहू अहवाल प्राप्त झाला. हे प्रकरण मूळचे सन २००८ पासूनचे आहे. उरण येथील अतिथी गृह, ऊर्जा केंद्र, निवासी वसाहत येथील किरकोळ कामं, गार्डनिंग व फॅब्रिकेशनच्या कामांचे तुकडे पाडण्याची पद्धत प्रचलित होती. ही कामे एकूण २.४६ करोड रुपयांची होती. या कामांचे तुकडे पाडून ते करण्यात आलेले होते. जर ही कामे एकत्रितपणे मान्य करण्याचा प्रस्ताव तयार केला गेला असता तर ती कामे मान्य करण्याकरिता वरच्या स्तरापर्यंत जाऊन निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून करावी लागली असती. परंतु खालच्या पातळीवरील अभियंत्यांच्या माध्यमातून त्यांना असलेल्या आर्थिक अधिकारांच्या अनुषंगाने या कामांचे तुकडे पाडण्यात आले होते. नंतर अंतर्गत परिक्षण तपासणी केल्यानंतर व त्यासंदर्भातील लेखापरीक्षा अहवालातील आक्षेप वाचल्यानंतर या सर्व बाबी लक्षात आलेल्या आहेत. सीजीएम श्री.गहाणेवार यांच्या मदतीने अंतर्गत परिक्षण अहवालावरुन या सर्व बाबी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. या चौकशीअंतर्गत चार अधिकारी दोषी आढळून आलेले आहेत. श्री.केदार, मुख्य अभियंता, श्री.पोळ,वित्त अधिकारी, श्री. प्रसाद, उप कार्यकारी अभियंता, श्री. सांगलीकर, कार्यकारी अभियंता ( सिव्हील ) यापैकी दोघे जण सन २०१०-२०११ च्या लेखा परिक्षण अहवालापूर्वी म्हणजे सन २००८ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत.

श्री. प्रसाद हे सन २०११ मध्ये सेवानिवृत्त झाले होते. श्री. प्रसाद यांची एक वेतनवाढ रोखून त्यांच्याकडून १,१८,००० रुपयांची वसुली करण्यात आलेली आहे. तसेच, उर्वरित रकमेची वसुली त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनामधून करण्यात येणार आहे. परळी येथील प्रकरणामध्ये तेथील अधिकाऱ्यांनी या प्रकारच्या कामामध्ये वेळकाढूपणा केल्यामुळे कामाची किंमत वाढली होती. श्री. सांगलीकर यांच्या विरुद्धची चौकशी दुर्दैवाने विभागाच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकलेली नाही. तसेच, असे प्रकार पुन्हा होऊ नये म्हणून सक्त आदेश दिलेले आहेत. अंतर्गत लेखा परिक्षण तपासणी करण्याचेही काम सुरू आहे. त्यानंतर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, याबाबत शासनाच्या विभागाकडून महालेखापाल कार्यालयात शेरा पाठविण्याकरिता उशीर झाला होता. म्हणून हा शेरा आलेला आहे. याबाबत महानिर्मितीने कार्यवाही केलेली आहे. याबाबतची जबाबदारी निश्चित करण्याच्या प्रक्रियेस सुरूवात करण्यात आलेली आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, ज्याप्रमाणे परळी प्रकल्पासंदर्भात यासारख्या प्रकरणावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली होती, तशीच शिस्तभंगाची कारवाई उरण प्रकल्पाबाबत करण्यात यावी. तसेच परळी येथे नेमके काय घडले होते, याबाबत समितीला कोणतीही माहिती दिलेली नाही. यासंदर्भात सोदाहरण स्पष्टता देत असतांना संबंधित उदाहरणाबाबत थोडक्यात माहिती देण्यात यावी. त्यानुषंगाने

विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, परळी येथील संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करुन त्यांची पदोन्नती रोखून त्यांना पदावनत करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, त्यांची वेतनवाढही रोखण्यात आलेली आहे. परळी येथील घटनेबाबत व उरण येथील घटनेमध्ये दोषी असलेल्यांविरुद्ध विभागीय चौकशी, वेतनवाढ रोखणे, पदावनती अशा प्रकारची कारवाई केलेली आहे.

त्यानंतर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विश्वसनीय माहितीवरुन ही कामे चांगली झालेली असून त्यामध्ये आर्थिक तोटा झालेला नाही. या संदर्भातील परिपत्रकांचे पालन झाले नव्हते, ही गोष्ट खरी आहे. या कामांची निविदा जर काढली असती तर अधिक चांगल्या ठेकेदारांकडे हे काम दिले गेले असते व स्पर्धात्मक बोली आल्या असत्या. परंतु परिपत्रक व आवश्यक नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध याची जबाबदारी निश्चित करण्याचे काम चालू आहे. हे काम निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून केले गेले असते तर यामध्ये बचत झाली असती, हेही खरे आहे. या प्रकरणाची खरी वस्तुस्थिती अशी आहे की, त्याठिकाणी कोणताही दुर्विनियोग (misappropriation) झालेला नाही.

**१.५ अभिप्राय व शिफारस :—**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.८ " आदेशाचे विभाजन " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी असे निदर्शनास आले की, उरण येथील फॅब्रिकेशन, छोटी बांधकामे, गार्डनिंग व इतर कामांची किंमत २.८६ कोटी रुपयांची होती. जर ही कामे एकत्रितपणे केली गेली असती तर त्याची मान्यता वरच्या स्तरापर्यंत घेऊन निविदा प्रक्रियेद्वारे ही कामे द्यावी लागली असती व कमीत कमी निविदा खुल्या करुन ते काम केले असते तर जवळ जवळ एकूण किमतीपेक्षा दहा टक्के रकमेची बचत झाली असती. आता स्पर्धेचे युग आहे, लोकांना कामे मिळत नाहीत, या कामांमध्ये सांघिय कार्य (टीमवर्क) असते. ही कामे एकाच कंत्राटदाराला दिल्यामुळे यात शासनाचे नुकसान झाले आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जे चौकशी अधिकारी नियुक्त करण्यात आले होते, त्यांना संबंधित अधिकारी केव्हा सेवानिवृत्त होणार आहेत याची माहिती होती संबंधित अधिकाऱ्यांकडून शासनाचे ज्या रकमेचे नुकसान झाले आहे ती रक्कम तो अधिकारी सेवानिवृत्त होताना त्याला शासनाकडून मिळणाऱ्या विविध फंडाच्या रकमेतून वळती करुन घ्यावयास पाहिजे होती. सदर अधिकारी सेवानिवृत्त झाल्यामुळे वसुली करता येत नाही, सेवानिवृत्त होऊन दोन वर्षे झाल्यानंतर ही बाब निदर्शनास येत असेल तर ते योग्य नाही. चौकशी अधिकाऱ्याच्या या बाबी लक्षात यावयास पाहिजे होत्या. यासंदर्भात योग्य ती दक्षता पुढील काळात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रत्येक वेळी महालेखाकार यांनीच या बाबी लक्षात आणून देण्याऐवजी महामंडळाने अंतर्गत परिक्षण **(Internal Audit) करणे आवश्यक होते याप्रकरणी महामंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या**

**बाबी लक्षात यावयास पाहिजे होत्या. या प्रकरणात जे चार अधिकारी गुंतले आहेत त्यामध्ये मुख्य महाव्यवस्थापक, मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता मुख्य उप अभियंता (सीजीएम, सीई, ईई व डीसीई) यांनी संगनमताने ही कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे त्या सर्वांवर कारवाई करण्यात यावी आणि जे अधिकारी आता नोकरीत आहेत त्यांची बदली ज्याठिकाणी करण्यात आली आहे. त्याठिकाणी या अधिकाऱ्याला महत्त्वाच्या किंवा आर्थिक बाबींशी निगडीत पदांवर नियुक्ती (lucrative किंवा Prime Posting) देण्यात येऊ नये, जे अधिकारी सहा महिन्यात सेवानिवृत्त होणार आहेत त्यांच्याकडे महत्त्वाचे विशेष अधिकार ठेवण्यात येऊ नयेत.** या खात्यातील काही अधिकारी सेवानिवृत्त व्हावयाच्या कालावधीमध्ये मनमानी करतात अशा अधिकाऱ्यांविरुद्ध वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योग्य ती कारवाई केली पाहिजे. सदर कामे एकत्रितपणे न देता विभागून दिल्यामुळे शासनाचे दहा टक्के रकमेचे नुकसान झालेले आहे. म्हणजेच जवळपास २८-३० लाख रुपयांचे शासनाचे नुकसान झालेले आहे. डीएसआर दराप्रमाणे व अंदाजपत्रकानुसार या कामामध्ये सकृतदर्शनी नुकसान झाल्याचे दिसून येत नसले तरीही शासनाचे दहा टक्के रकमेचे नुकसान झालेले आहे. संबंधित खालच्या स्तरावरील अभियंत्यांनी या कामांचे तुकडे करून छोट्या छोट्या कामांमध्ये या कामांचे वाटप करून त्यांच्या स्तरावरच या कामांना मान्यता दिलेली आहे. **त्यामुळे सदरहू प्रकरणी खालच्या स्तरापासून या कामाची सखोल चौकशी करण्यात यावी व जबाबदारी निश्चित करण्याकरिता कालबद्ध कार्यक्रमाची आखणी निश्चित करण्यात यावी. अशी समिती शिफारस करीत आहे तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

## " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित "

### (सन- २०१२-१३)

**दोन - पुरवठादाराला अदेय फायदा :— (कंपनीने फ्लाय ॲश पंपाच्या खरेदीसाठी रु.४.०१ कोटीचा निष्फळ खर्च केला.)**

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.११ मध्ये " पुरवठादाराला अदेय फायदा " या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितने (कंपनी) आपल्या औष्णिक ऊर्जा केंद्र (टीपीएस), भुसावळ येथील ३० वर्ष जुने झालेले फ्लाय ॲश पंप व ॲश हाताळण्याच्या यंत्र संचातील/गतिवर्धक पंप घरमधील मोटर्स बदलण्याचे ठरविले. (जून, २०१०) जेणेकरुन सततची दुरूस्ती व परिणामी कमी वीज निर्मितीमुळे होणारे नुकसान टाळता येईल. त्यानुसार, कंपनीने तीन पंप/मोटर्स व इतर तत्सम विद्युत/नागरी कामाचे पुरवठा व कार्यान्वित करण्याचे आदेश लखवी ॲण्ड एस्के इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड (एल.ई.ई.पी.एल.) नवी मुंबई यांना रु.४.४९ कोटी (एल-१) किमतीला देण्यात (डिसेंबर, २०१०) आले होते.

कंत्राटाच्या अटीनुसार, उपकरणांची हमी कार्यान्वयनाच्या दिनांकापासून १८ महिने अथवा पुरवठा केल्याच्या दिनांकापासून २४ महिने यापैकी जी आधी असेल ती होती. एका पंपाचे (बी-१) कार्यान्वयन ७ जून २०११ रोजी व उर्वरित दोन पंपाचे (बी-२ आणि बी-३) कार्यान्वयन २७ जून २०११ रोजी करण्यात आले होते. तथापि, बी-२ व बी-३ पंपामध्ये प्रथम दोष २ जुलै २०११ रोजी व बी-१ पंपामध्ये १९ जुलै २०११ रोजी आढळून आले. वारंवार होणाऱ्या बिघाडामुळे पंपाची कार्यान्वयनापासूनची उपलब्धता टक्केवारी ७.६९ ते ८.२१ या दरम्यान होती. त्यामुळे १३ मार्च २०१२ (बी-२ आणि बी-३) व १९ ऑक्टोबर २०१२ (बी-१) पासून सर्व पंपाची सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली.

आमच्या असे निदर्शनास आले (फेब्रुवारी,२०१३) की कंपनीने करार किमतीच्या १० टक्के सुरक्षा ठेव (एसडी) रु.४४.९५ लाख न घेता त्याऐवजी केवळ रु. ३ लाख एसडी एलईईपीएलकडून घेतली होती. निविदेतील अटीनुसार ज्या पुरवठादाराची रु. ३ लाख कायम ठेव (पीडी) कंपनीच्या प्रत्येक टीपीएसमध्ये असेल त्यांनाच करार किमतीच्या १० टक्के एसडी देण्यापासून सूट होती. एलईईपीएलला कुठल्याही टीपीएसला पुरवठा केल्याचा अनुभव नव्हता व पीडीची अगोदरपासून व्यवस्था नव्हती. त्यामुळे एलईईपीएलला किमतीच्या १० टक्के एसडीमध्ये देण्यात आलेली सूट ही अनियमित होती. याशिवाय, पंपाचे १९ जुलै २०११ ते ८ ऑगस्ट २०११ (बी-१) व ३ जुलै २०११ ते २२ ऑगस्ट २०११ (बी-२ आणि बी-३) दरम्यान पूर्णपणे बंद असतांना देखील कंपनीने उर्वरित रु. २१ लाखाचे एलईईपीएलला २९ जुलै २०११ रोजी प्रदान केले. अशा रीतीने, कंपनीने रु. ६२.९५ लाखाचा अदेय फायदा पुरवठादाराला दिला. ही उपकरणे अद्यापपर्यंत

दुर्लक्षित पडली होती. (एप्रिल, २०१३) व नवीन पंप काढल्यावर त्या जागी पुन्हा जुने पंप कार्यान्वित केले होते. अशा रीतीने, रु. ४.०१ कोटीचा संपूर्ण खर्च (एकूण किंमत रु. ४.४९ कोटी वजा बँक हमी/ वटवलेली एसडी रु.०.४८ कोटी) निष्फळ ठरला.

व्यवस्थापनाने असे म्हटले (जानेवारी,२०१४) की, कंपनीने पीडी स्वीकारण्याची प्रथा बंद केली आहे व पुनः कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक सामग्री पुरवठा करण्याची बाब पंपाच्या डिलरबरोबर घेतली आहे. राज्य शासनाने (फेब्रुवारी,२०१४) उत्तरास दुजोरा दिला होता. तथापि, दोष आढळला तरी देखील उर्वरित प्रदान करण्यामागच्या कारणांचा तपशील उत्तरात नव्हता. त्यामुळे पंप खरेदी करायाचा हेतू असफल झाला व कंपनीने त्यांच्या आर्थिक हिताचे देखील संरक्षण केले नाही.

**२.२** यात्प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, या पूर्वीच्या उत्तरात, सदर पंप कसे स्थापित करण्यात आले व कसे कार्यान्वित करण्यात आले. तसेच प्रायोजिक कार्यान्वयन यशस्वी झाल्यानंतरच पैसे देण्यात आले याची तपशीलवार माहिती स्पष्ट करण्यात आली होती. आधी सादर केलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अधिक माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येते.

कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार (पंपांची) स्थापना, कार्यान्वयन आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाल्यानंतर प्रारंभीचे रु. २१ लाख द्यावयाचे होते. त्याप्रमाणे नमूद केलेली रक्कम देण्यात आली. तसेच कंत्राटातील अटी व शर्ती यानुसार प्रायोगिक कार्यान्वयनाच्या यशस्वी पूर्ततेनंतर शिल्लक रक्कम द्यावयाची होती. बी-१ या पंपाचे प्रायोगिक कार्यान्वयन दि. ७ जून २०११ रोजी करण्यात आले. व बी-१ या पंपाच्या उत्सर्जनाचा प्रवाह ४.५ कि.मी. अंतरापर्यंत आवश्यक त्या दाबाने बी.पी.एच.पर्यंत आहे असे सिद्ध झाले होते. बी-२ व बी-३ या पंपाचे प्रायोगिक कार्यान्वयन दि. २० जून २०११ रोजी झाले आणि दोन्ही बी-२ व बी-३ पंपाच्या उत्सर्जनाचा प्रवाह ९.५ किमी अंतरावरील राखेच्या साठ्यापर्यंत (ॲश बंड) आवश्यकतेनुसार होत असल्याचे निरीक्षणांनी सिद्ध झाले या आधारे काम पूर्ण झाल्याचा अहवाल संयुक्तपणे तयार करण्यात आला आणि त्यावर महानिर्मिती व मेसर्स एलइइपीएल या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी सह्या केल्या आणि अटी व शर्ती यानुसार सर्व ३ पंपाचे प्रायोगिक कार्यान्वयन पूर्ण झाल्यावर शिल्लक रक्कम देण्यात आली. महानिर्मिती कंपनीच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी संबंधित संस्थेकडून कार्यपालनाची हमी यापूर्वीच घेण्यात आली होती. त्या हमीचे रोखीकरण करण्यात आले व महानिर्मिती कंपनीचे वित्तीय हिताचे रक्षण करण्यात आले. वरील सादर केलेले स्पष्टीकरण विचारात घेऊन हा परिच्छेद बंद करण्याची शिफारस करण्याची विनंती करण्यात येते.

**२.३** याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, कंपनीच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

२.४ समितीला ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २४ जून २०१५ रोजी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ४.११ " पुरवठादाराला अदेय फायदा " याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात समितीने विचारले की, रक्कम प्रदान करण्यापूर्वी दोष आढळून आल्यानंतरही कंपनीने उर्वरित रक्कम का प्रदान केली तसेच महानिर्मितीने केलेल्या खुलाशाशी राज्य शासन सहमत आहे काय, यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, एकूण ३ पंप बसविण्यात आले होते. त्यांची किंमत ४ कोटी ४९ लाख रुपये होती. करार करण्यात आला त्यावेळी सुरक्षा ठेव एकूण रकमेच्या १० टक्के न घेता ३ लाख रुपये रक्कम घेण्यात आली. यानंतर पंपामध्ये बिघाड झाला व तरी देखील २३ लक्ष रुपये अदा करण्यात आले, असा आक्षेप घेण्यात आला असून, सदर करार मुख्य अभियंता यांच्या पातळीवर करण्यात आला होता. जुने पंप बदलून देण्याचे ठरले होते. नवीन तंत्रज्ञानानुसार नवीन पंप बसविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ३ पंप एका ठिकाणी लावायचे होते, त्याऐवजी एक पंप लावण्यात आला. या पंपाची तेवढी क्षमता होती. जवळजवळ सव्वा वर्षामध्ये पंपाच्या खर्चाची परतफेड होणार होती. ३ लाख रुपये सुरक्षा ठेव घेऊन करार करण्यात आला.

कंपनीच्या स्थायी सूचनांनुसार महानिर्मितीने करार केल्यानंतर सुरक्षा ठेव म्हणून १० टक्के रक्कम ४९ लाख रुपयांऐवजी कार्यानुमापन हमी म्हणून ३ लाख रुपये घेण्यात आले. करारातील अटी व शर्तीप्रमाणे ८० टक्के रक्कम सामुग्री पोहोचती झाल्यानंतर देण्याचे ठरले होते. त्यानुसार साठा आल्यानंतर करारानुसार पैसे देण्यात आले व उर्वरित २० टक्के रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर देण्याचे ठरले होते. कार्यान्वयन झाल्यानंतर एक पंपामध्ये बिघाड आला. हा बिघाड दुरुस्त केल्यानंतर दुसऱ्या पंपामध्ये देखील बिघाड आला. त्या पंपाला देखील दुरुस्त केले. पंपाची दुरुस्ती केल्यानंतर २३ लाख रुपये अदा करण्यात आले. मात्र या नंतर पंपाचे काम सुरू राहिले नाही. फ्लाय अॅश काढावयाची असल्यामुळे या पंपाच्या जागी जुने पंप लावण्यात आले. दीड वर्षामध्ये हे पंप बदलण्यात आले.

सदर कंपनीकडून कार्यानुमापन हमी म्हणून ४९ लाख रुपये जप्त करण्यात आले होते. सर्व साहित्य बदलून द्यावे अन्यथा कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असे कंपनीला कळविले असून त्या नुसार कार्यवाही सुरु आहे. त्यावेळच्या स्थायी सूचनांनुसार (स्टँडींग इन्स्ट्रक्शन्स) सुरक्षा ठेव ३ लाख रुपये एवढी रक्कम घेण्यात आली व कंपनीला प्रतिरोधीत (डिबार्ड) करण्यात आले आहे. तसेच पंपामध्ये बिघाड होत असूनही शेवटची रक्कम का अदा करण्यात आली, अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, या करिता बोर्डाची मंजुरी असल्याशिवाय आता करार करता येणार नाही. तसेच कंत्राटदाराच्या पात्रतेबाबत कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. नॉन डीपीआर वर मुख्य अभियंता यांनी सह्या केल्या होत्या ती पद्धत आता बंद करण्यात आली आहे. तसेच, स्थायी सूचनामध्ये सुधारणा देखील केली आहे.

यासंदर्भात समितीने नमूद केले की, महानिर्मिती कंपनीचा संपूर्ण खर्च रु. ४.४९ कोटी रुपये वाया गेला आहे. तसेच सदर कंपनीची १० टक्के सुरक्षा ठेव परत करण्यात आली. करारावर सह्या होईपर्यंत डिपॉझिटची रक्कम ठेवण्याबाबत तरतूद होती. त्यानुसार ४९ लाख रुपये परत करण्यात आले. तसेच करार किमतीच्या १० टक्के रक्कम घेण्याऐवजी ३ लाख रुपये घेण्यात आले. याबाबत विभागाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, या कराराच्या कागदपत्रावरुन असे लक्षात येत आहे की, ४.२९ कोटी रुपयांच्या या व्यवहारामध्ये सदरहू जुने व निकामी पाईप बदलवून देण्याबाबतची अट किंवा शर्त आहे. करारातील अटी व शर्ती तपासून, तांत्रिक परीक्षण झाल्यानंतर ज्या उणीवा आढळून येतील, त्याप्रमाणे या संदर्भात योग्य ती कार्यवाही करून त्या संदर्भातील अहवाल सविस्तरपणे समितीसमोर सादर करण्यात येईल.

**२.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ४.११ " पुरवठादाराला अदेय फायदा " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी असे आढळून आले की, ज्या कंपनीकडून काम केले जाते, त्यांच्याकडून कायम ठेव घेतली जाते. मात्र लखवी ॲन्ड एस्के इंजिनिअर्स प्रायव्हेट लि., नवी मुंबई (एलईईपीएल) या कंपनीला कुठल्याही औष्णिक ऊर्जा केंद्राला (टीपीएस) पुरवठा केल्याचा अनुभव नव्हता व कायम ठेव (पीडी) ची पूर्वीपासून व्यवस्था केलेली नव्हती. सदर कंपनी पहिल्यांदा काम करीत होती. नियमित पुरवठादार नव्हती असे असताना देखील कंपनीला सूट देण्यात आली आहे. सुरक्षा ठेव एकूण रकमेच्या १० टक्के न घेता रु. ३ लाख रक्कम घेण्यात आली यानंतर पंपामध्ये बिघाड झाला व तरी देखील रु. २३ लाख अदा करण्यात महालेखापालांनी आक्षेप घेतल्यानंतर १० टक्के सुरक्षा ठेव रक्कम घेण्यासंदर्भातील सुधारणा आधी करणे अपेक्षित असताना देखील ही सुधारणा जाणीवपूर्वक उशीराने केल्याचे दिसून येते **याप्रकरणी समिती अतिशय गंभीर असून उपरोक्त निर्णय कोणी घेतला व कोणत्या अधिकाऱ्याच्या कार्यकाळात सदरहू पंप न बदलता दुरुस्ती करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला याबाबतची सविस्तर माहिती समितीस सादर करण्यात यावी.**

बी-१ पंपाचे कार्यान्वयन ७ जून २०११ रोजी व उर्वरित दोन पंपाचे बी-२ व बी-३ चे कार्यान्वयन २७ जून २०११ रोजी करण्यात आले. बी-२ व बी-३ पंपामध्ये प्रथम दोष दि.२ जुलै २०११ रोजी व बी-१ पंपामध्ये दि. १९ जुलै २०११ रोजी आढळून आला. यावरुन असे निदर्शनास येते की, बी-२ व बी-३ या पंपामधील बिघाड कार्यान्वयन झाल्यानंतर ५ दिवसातच झालेला आहे. त्यामुळे एलईईपीएल या कंपनीला सुरक्षा ठेव रक्कम देण्याकरिता महानिर्मिती कंपनीकडून का घाई करण्यात आली हे स्पष्ट होत नाही तसेच सध्या जुने पंप वापरले जात आहेत. या संदर्भात महानिर्मिती कंपनीने जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. कोणाच्या चुकीमुळे हे नुकसान झालेले आहे यासाठी कंत्राटदार, पुरवठादार व ज्यांनी कंत्राट केले

त्यांची संपूर्ण चौकशी त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात यावी. महानिर्मिती कंपनीचे ४.५ कोटी रुपयांचे नुकसान होऊन देखील याबाबत चौकशी सुद्धा झालेली नाही हा प्रयोग राबविणारे अधिकारी सेवानिवृत्त झाले. त्यांना शासितही करता येत नाही, हे मोठे दुर्दैव आहे. यातून असे लक्षात येते की, **वीज निर्मिती विभागासारख्या महत्त्वाच्या विभागामध्ये देखील कशा प्रकारचे असफल प्रयोग राबविले जातात. त्यामुळे शासनाचा निधी वाया जातो, एवढेच नाही तर सर्वात महत्त्वाचा असा वेळही वाया जातो असे समितीचे स्पष्ट मत आहे. केंद्रीय ऊर्जा संशोधन संस्था (सीपीआरआय) मार्फत तांत्रिक परिक्षण (टेक्निकल ऑडिट) केल्यानंतर समितीला या संदर्भातील अनुपालन अहवाल (कम्प्लायन्स रिपोर्ट) सादर करण्यात यावा.** सकृतदर्शनी असे लक्षात येते की, एलईईपीएल कंपनीला मदत करण्याकरिता हा व्यवहार करण्यात आला होता. कायम ठेव (पीडी) आणि सुरक्षा ठेव (एसडी) यामध्ये अनियमित सूट देऊन पंपासंदर्भातील करण्यात आलेला व्यवहार, पंप बसविल्यानंतर ते जुने आहेत, असे लक्षात आल्यानंतरही करण्यात न आलेली कारवाई, या सर्व बाबींवरुन असे दिसून येते की, सदरहू खाजगी कंपनीच्या फायद्याकरिता हा व्यवहार केला गेला होता. त्यामुळे **या प्रकरणाशी संबंधित तत्कालिन अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, याबाबतची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीला सादर करण्यात यावी.**

# " महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित "

## (सन- २०११-२०१२)

**तीन - टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च :— (स्वत:ची उत्पादन क्षमता न वापरता खाजगी संस्थांकडून खांबांची खरेदी केल्यामुळे कंपनीला रु. ८६.६८ लाखांचा टाळता येण्याजोगा जास्तीचा खर्च झाला.)**

**३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-१२ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.७- मध्ये " टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च " या संदर्भात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले होते की, पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे (एमएसईबी) विद्युत वितरण वाहिन्या टाकण्यासाठी लागणाऱ्या सिमेंट खांबाची निर्मिती करणारे सहा* खांब कारखाने होते. पुनर्रचनेनंतर हे कारखाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (कंपनी) कडे हस्तांतरित झाले. दरवर्षी ८ मीटर लांबी असलेल्या ०.९६ लाख खांबाची निर्मिती करण्याची या सहा कारखान्यांची क्षमता होती. वर्ष २०१०-११ मध्ये या सहा कारखान्यांची उत्पादन क्षमता वापर १७ आणि ५७ टक्के होती व नंतर २०११-१२ मध्ये ती ८ ते ३३ टक्क्यापर्यंत घसरली.

आम्हाला असे आढळून आले (फेब्रुवारी, २०१२) की, कंपनीस सन २०१०-११ आणि २०११-१२ मध्ये ८ मीटर लांबीच्या क्रमशः ०.८९ लाख आणि ०.५२ लाख खांबाची आवश्यकता असताना खांब उत्पादन कारखान्यांचे वार्षिक उत्पादन मात्र अनुक्रमे फक्त ०.३२ लाख आणि ०.१९ लाख एवढेच होते. आपल्या गरजपूर्तीसाठी वर्ष २०१०-११ आणि २०११-१२ मध्ये कंपनीने वरील सहा खांब उत्पादन कारखान्यांकडून आपूर्ती केल्या जाणाऱ्या विभागांसाठी प्रति खांब रु. १,३५३ ते रु १,७८१ या दराने ०.९० लाख खांब बाहेरुन खरेदी केले होते. परंतु वरील सहा खांब उत्पादन कारखान्यांचा प्रतिखांब उत्पादन खर्च गेल्या दोन वर्षात रु. १,१३७ ते रु १,६०५ प्रति खांब एवढा होता. खांब पुरवठ्याचे काम बाहेरुन करण्यापूर्वी कंपनीने खर्च लाभाचे विश्लेषण केले नव्हते व उपलब्ध अंतर्गत उत्पादन क्षमता अधिकतम पातळीपर्यंत वापरली नव्हती.

खांब निर्मिती कारखाने आपल्या स्थापित क्षमतेच्या सुमारे ८० टक्के क्षमतेचा उत्तम उपयोग करू शकतात असे गृहित धरले तरी कंपनी ०.५२ लाख खांबांची निर्मिती आपल्याच कारखान्यात करू शकली असती व बाहेरुन खांब खरेदी करण्याने झालेला रु. ८६.६८ लाखांचा अतिरिक्त खर्च टाळता आला असता. व्यवस्थापनाने उत्तरादाखल सांगितले (ऑक्टोबर २०१२) की, खांब निर्मिती केंद्रांच्या वाईट कार्मागिरीस कंपनीची आर्थिक तंगी कारणीभूत होती. ज्यामुळे कच्चा मालाची खरेदी आवश्यकतेनुसार वेळचे वेळी करता आली नाही.

कंपनीचे उत्तर स्विकार्य नाही. कारण उत्पादन क्षमतेचा पर्याप्त वापर न करण्यात आर्थिक तंगीचे कारण असू शकत नाही. कारण कंपनीने आपली गरज बाहेरील संस्थाकडून जास्त दराने खरेदी करून पूर्ण केली होती. ही बाब शासनाला (जून २०१२) कळविण्यात आली होती, त्यांचे उत्तर मिळाले नव्हते (डिसेंबर २०१२).

---

* बीड, जळगाव, नरसी, पेरणे, राहूरी आणि सातपूर.

३.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, खांब कारखान्यात तयार करण्यात आलेल्या विद्युत खांबांचा वापर जुने खांब बदलण्यासाठी आणि पाणीपुरवठा व पथदिवे यांच्या नव्या वीज जोडणीसाठी करण्यात येतो. वर्ष २०१०-११ मध्ये ८ मीटर लांबीचे ०.३४ लाख खांबांचे आणि वर्ष २०११-१२ मध्ये ०.१८ लाख खांबांचे उत्पादन सहा (६) कारखान्यात करण्यात आले. याशिवाय कंपनीने कारखान्याच्या अधिकार क्षेत्रात वर्ष २०१०-११ दरम्यान ०.६२ लाख खांब आणि वर्ष २०११-१२ दरम्यान ०.२० लाख खांब खरेदी (Procured) केले या खरेदीचे दर प्रति खांबास रु. १२३५ ते रु. १५०० या दरम्यान होते. ते लेखापरिक्षित मजकुराच्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे प्रति खांबास रु. १३५३ ते रु. १७८१ असे नव्हते. तसेच एका खांबाचा निर्मिती खर्च हा रु. १२०० ते रु. १६०० दरम्यान असतो. तो तेथील क्षमतेच्या वापरानुसार असतो. सोबत जोडलेल्या विवरणपत्रावरुन स्पष्ट होईल की, सदर खर्चाचे विवरणपत्र हे मूल्य निर्धारणांसाठी केलेले आहे. खांबाचे प्रत्यक्ष खर्चाचे विवरण करण्यात आलेले नाही. याशिवाय या खर्चात अप्रत्यक्ष खर्च म्हणजेच मंडळ कार्यालय, परिमंडळ कार्यालये व मुख्य कार्यालयाचा प्रशासकीय खर्च समाविष्ट केलेला नाही. जर अप्रत्यक्ष खर्चाचा काही भाग विचारात / हिशेबात घेतल्यानंतर खांबांचा उत्पादन खर्च वाढून तो खांबाच्या खरेदी खर्चाइतका होईल.

या सहा कारखान्यातील उत्पादन क्षमतेचा वापर वर्ष २०१०-११ मध्ये १७ टक्के ते ५७ टक्के दरम्यान आणि तो वर्ष २०११-१२ मध्ये ०८ टक्के ते ३३ टक्के दरम्यान होता. क्षमतेचा वापर कमी झालेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे पायाभूत सुविधाच्या विकासाची कामे व इतर कामे " टर्न की " कंत्राट पद्धतीने दिल्याने असे खांब त्या कराराद्वारे खरेदी करण्यात आले आहेत. पायाभूत सुविधाच्या कामासाठी कंपनीने " टर्न की " कंत्राटे (साहित्याच्या पुरवठ्यासह) देण्याचा निर्णय खालील बाबींचा विचार करून घेतला. या कामासाठी कंत्राटदार साहित्याचा पुरवठा तसेच, कामाचे बांधकाम, रचना कंपनीने दिलेल्या आदेशानुसार पूर्ण करून देतात. कंत्राटाच्या करारातील अटी व शर्तीनुसार कंत्राटदार हा कामाची उभारणी करण्यासाठी जबाबदार असतो. तसेच त्यात बांधकामास वापरण्यात येणाऱ्या साहित्याची जबाबदारी त्यांची असते. जर " टर्न की " कंत्राट अंशतः तत्वावर दिले तर त्यात खूप अडचणी येतात, असा अनुभव आहे. यात कामाची प्रगती व खांबाच्या उत्पादनाचे वेळापत्रक एकमेकास अनुरुप नसते. तसेच पूर्वीच्या मराविमंने पुरविलेल्या सामानानुसार केलेल्या कामाची हमी देण्यास कंत्राटदार तयार नसतात. म्हणून महावितरण कंपनी अस्तित्वात आल्यानंतर कंपनीने पायाभूत कामांचे " टर्न की " कंत्राटे देण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये सामान व कामाची पूर्तता या दोन्हीचा समावेश असतो. खांब उत्पादन करणाऱ्या एकूण १७ कारखान्यांपैकी काही कारखाने कमी क्षमता वापराच्या कारणास्तव बंद करण्याचे विचाराधीन आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून प्राप्त झालेले विवरणपत्र

CIVIL DIVISION PUNE

Office of the Dy.Ex..Engineer(C) ,M.S.E.D.CO. Ltd.

POLE FACTORY PERNE.

*COST OF PCC POLES AT POLE FACTORY PERNE, w.e.f. 01-04-2011*

| Sr. No | Particulars | Rate | 8 mtrs Poles | | 9 mtrs Poles | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Consumption | Amount | Consumption | Amount |
| 1 | Cement | 244.56 | 1.3 | 317.93 | 1.9 | 464.66 |
| 2 | Stone Metal | 557:27 | 0.118 | 65.76 | 0.174 | 96.96 |
| 3 | Sand | 1212.1 | 0.075 | 90.91 | 0.11 | 133.33 |
| 4 | Anchor Grips | L.S | L.S. | 1.5 | L.S. | 1.75 |
| 5 | 4 mm H.T. Wire | 45.52 | 7.60 | 345.95 | 11.54 | 525.30 |
| 6 | Welding Rod | 2.02 | L.S. | 1.08 | L.S. | 1.66 |
| 7 | Nut Bolt | 70.72 | 0.07 | 4.95 | 0.08 | 5.66 |
| 8 | Binding Wire | 70.72 | 0.02 | 1.41 | 0.03 | 2.12 |
| 9 | Elect. / Water Charges | L.S | L.S. | 12.00 | L.S. | 17.00 |
| 10 | G.I. Wire | 38 | 0.6 | 22.80 | 0.68 | 25.84 |
| | | TOTAL (A) | | 864.29 | | 1274.29 |
| 11 | Repairs & Maintenance | 2.50% | of (A) | 21.61 | | 31.86 |
| 12 | Labour Charges | | | 173.67 | | 297.1 |
| | | TOTAL (B) | | 195.28 | | 328.96 |
| | | TOTAL of (A) + (B) | | 1059.57 | | 1603.24 |
| 13 | Depreciation | 2.50% | of (A) + (B) | 26.49 | | 40.08 |
| 14 | Breakage | 1.00% | of (A) + (B) | 10.60 | | 16.03 |
| 15 | Supervision Charges | 15.00% | of (A) + (B) | 158.93 | | 240.49 |
| | | TOTAL (C) | | 196.02 | | 296.60 |
| | | GRAND TOTAL (A+B+C) | | 1255.59 | | 1899.85 |
| | | SAY Rs. | | 1256.00 | | 1900.00 |

Assessable Value w.e.f. 01-04-2011

1] P.C.C. Pole 8m long Rs = 1256.00 / Pole

2] P.C.C. Pole 9m long Rs = 1900.00 / Pole

TRUE - COPY

Dy. Ex. Eng. (C)
M. S. E. Dist. Co. Ltd.
Pole Factory, PERNE

(शा.म.मु.) एचबी १५३४—३ (६५०—१२-२०१५)

३.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, कंपनीच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

३.४ समितीला ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १ सप्टेंबर,२०१५ रोजी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ३.७ " टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च " याबाबत एमएसईबीचे स्वतःचे पोल उत्पादन करणारे कारखाने असताना सुद्धा बाह्यस्रोताद्वारे (आऊटसोर्सिंग) खांब खरेदी केल्यामुळे एमएसईबीचे नुकसान झाल्याचा आक्षेप महालेखाकारांनी उपस्थित केला आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी व कंपनीच्या प्रतिनिधींनी खुलासा करताना एमएसईबीचे खांब उत्पादन करणारे १७ कारखाने आहेत. त्यामधील काही कारखान्यांमधून उत्पादन होते तर काही कारखान्यांमधून उत्पादन होत नाही. महावितरणाच्या विद्युत वितरणासाठी खांबाचा उपयोग केला जातो.

एमएसईबीने स्वतःच्या कारखान्यांची उत्पादन क्षमता पूर्णपणे न वापरता बाह्यस्त्रोताद्वारे खरेदी केली, ही वस्तुस्थिती आहे. ही खरेदी करीत असताना अतिरिक्त खर्च करण्यात आला, असा आक्षेप आहे. ज्या काळात ही खरेदी करण्यात आली त्यावेळी असे लक्षात आले की, सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या कालावधीत बाहेरुन केलेली खरेदी स्वस्त दराने देखील करण्यात आलेली आहे. नियोजन करीत असताना मागणी किती आहे, प्रत्यक्ष उत्पादन किती आहे व वापर किती आहे, याबाबतचे नियोजन नव्हते किंवा उत्पादनाचे वेळापत्रक (शेड्युल) नव्हते. प्रत्येक कारखान्यांमध्ये एमएसईबीचे १ कार्यकारी अभियंता, २ उप अभियंता व ४-५ अन्य कर्मचारी एवढे मनुष्यबळ कार्यरत होते व अन्य कामगार कंत्राटी पद्धतीने नेमून कारखान्यामधून उत्पादन घेतले जात होते. या कारखान्यांमधून उत्पादन घेत असताना किती खांब लागणार आहेत, किती खांबांचा वापर होणार आहे, याचे नियोजन करता आले असते तर ही परिस्थिती टाळता आली असती. परंतु, जशी गरज निर्माण झाली त्याप्रमाणे उत्पादन घेण्यात आले आणि ज्यावेळी अधिक खांबांची गरज निर्माण झाली तेव्हा बाहेरुन खांबांची खरेदी करण्यात आली.

कारखान्यांमधील यंत्रसामुग्री अत्यंत जुनी झालेली आहे. सन २०१३-२०१४ मध्ये केवळ १० हजार खांबांचे उत्पादन घेण्यात आले. विद्युतीकरणाची कंत्राटे देत असताना मोठ्या प्रमाणावर (टर्न की पद्धतीने) देण्यात येतात. त्यामध्ये खांबासारख्या साधनसामुग्रीचाही समावेश असतो. त्यामुळे कंत्राटदारच खांब स्वतः उपलब्ध करून घेतात. तसेच, आवश्यकता असेल तर स्थानिक पातळीवर खांबांची खरेदी केली जाते. या सर्व पार्श्वभूमीवर सध्या असलेले सर्व खांब कारखाने सुरू ठेवावेत वा, त्यामधील काही बंद करावेत, बंद केलेल्या कारखान्यांतील मनुष्यबळ सुरू असलेल्या अन्य कारखान्यांमध्ये वर्ग करावेत का, बंद करण्यात येणाऱ्या कारखान्यांच्या जमिनींचा अधिक चांगल्या गोष्टीसाठी वापर करता येईल का, अशा प्रकारे सुधारणात्मक बाबींसंबंधीचा प्रस्ताव यापूर्वीच कंपनीने विचारात घेतला असून तो आता मंडळापुढे सादर करण्यात येणार आहे. मंडळाने सर्व खांब कारखाने बंद केले तर खाजगी खांब कारखान्यांची मक्तेदारी

होऊन मंडळाला अधिक दराने खांब खरेदी करावे लागतील. त्यामुळे मक्तेदारी न होण्याच्या दृष्टीकोनातून काही कारखाने बंद करून काही कारखाने सुरू ठेवावेत, असा कंपनीचा मानस आहे.

याबाबत समितीने विचारणा केली की, कंपनीच्या बीड, जळगाव, नरसी, परभणी, राहुरी आणि सातपूर या कारखान्यांची खांब निर्मिती क्षमता सन २०१०-२०११ मध्ये ६७ आणि ५७ टक्के होती व नंतर ती २०११-२०१२ मध्ये ८ ते ३३ टक्क्यांपर्यंत घसरल्याची बाब लेखापरिक्षणातून पुढे आली आहे. कंपनीला खांबांची आवश्यकता असल्यामुळे बाहेरुन खरेदी करण्यात येते आणि दुसरीकडे स्वतःच्या कारखान्यांची उत्पादन क्षमता असताना त्या क्षमतेचा पुरेपूर वापर केला जात नाही. यामागील कारणे काय आहेत. **कंपनीचे स्वतःचे कारखाने असताना बाहेरुन खरेदी का केली जाते, असा प्रश्न सातत्याने समितीसमोर** उभा रहात आहे व त्याचे समाधानकारक उत्तर अद्यापही समितीला मिळालेले नाही.

यासंदर्भात कंपनीच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन २०१३-२०१४ मध्ये ९५६५ खांबांचे उत्पादन झाले, उत्पादन ४ टक्क्यांवर आले. कंपनीला त्यावेळी १० लाख खांबांची आवश्यकता होती व आता २ लाख खांबांची आवश्यकता आहे. वादळ, अतिवृष्टी यासारखी नैसर्गिक आपत्ती आली तर खांबांची गरज वाढते. उत्पादन पाहिले तर सन २०१२-२०१३ मध्ये ५७८२ खांबांचे उत्पादन झाले आणि सन २०१३-२०१४ मध्ये ९५१५ खांबांचे उत्पादित घेण्यात आले. त्यामुळे मागील ३ ते ४ वर्षांत बाहेरुन खरेदी केली जात आहे. एकूण मागणी लक्षात घेऊन व त्याप्रमाणे नियोजन करुन सध्या असलेल्या कारखान्यांपैकी ४-६ कारखाने सुरु ठेवण्याबाबतचे धोरण कंपनी ठरवेल.

**३.५ अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.७ “ टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च ” या शीर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी असे आढळून आले की, बाहेरुन खरेदी करण्यात आलेले खांब आणि कंपनीच्या कारखान्यांमध्ये उत्पादित झालेले खांब यांच्या गुणवत्तेसंदर्भात तुलनात्मक अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. तसेच कंपनीत केवळ ७-८ अधिकारी / कर्मचारी तेथे कार्यरत असून उर्वरित सर्व मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने घेण्यात येत असताना वेतनवाढीचा प्रश्न उद्भवत नाही, तरी देखील खांब खरेदी बाहेरुन करण्यात येते. **यासंदर्भात समितीने असा अभिप्राय व्यक्त केला की, सन २०११-२०१२ मध्ये खांबांची खरेदी बाहेरुन केली असली तरी त्यावेळी खांब कमी किंमतीत मिळाले आहेत व बाहेरुन खरेदी केल्यामुळे कंपनीच्या कारखान्यातील मनुष्यबळ उत्पादनाअभावी बसून होते व त्यामुळे त्यांच्या वेतनावरील खर्चाचा भूर्दंड उत्पादन घेतले नसले तरी कंपनीला सहन करावा लागला. बाहेरुन खरेदी केलेल्या खांबांची किंमत आणि कंपनीच्या मनुष्यबळावर झालेला खर्च यांची गोळाबेरीज करून खांबांची किंमत काढल्यास कंपनीचा खांबांवरील खर्च अधिक झाल्याचे दिसून येते, समितीच्या असेही निदर्शनास आले की, सातारा येथील खांब कारखान्याची आकडेवारी पाहिली असता**

**प्रतिष्ठापन क्षमता १४४०० पोल एवढे असताना प्रत्यक्षात उत्पादन मात्र ३९३६ खांब एवढे असल्याने उत्पादन खर्च प्रति खांब १४६२ रुपये आहे यावरुन असे दिसून येते की, प्रत्यक्ष उत्पादन क्षमतेपेक्षा खांबांचे उत्पादन कमी घेण्यात आले आहे. याबाबत समिती नाराजी व्यक्त करीत आहे.**

राहुरी येथील कारखान्यामधील खांबाची किंमत ११३७ रुपये आहे आणि खाजगीमध्ये घेतलेल्या खांबांची किंमत १७८१ रुपये आहे. एका खांबासाठी जवळपास ६५० रूपये म्हणजे ५० टक्क्यांपेक्षा जास्त पैसे कंपनीने दिले आहेत. कंपनीने केलेल्या खुलाशात असे स्पष्ट केले की, सर्व खांबांचे कारखाने बंद न करता काही कारखाने बंद करण्यात येणार आहेत. **याबाबत समिती अशी शिफारस करते की, महामंडळाने काही खांबांचे कारखाने बंद करण्याऐवजी ते कारखाने कोणाला तरी चालवायला द्यावेत आणि त्यांच्या समवेत कंत्राट करून कंपनीसाठी खांब घ्यावेत. त्यामुळे कंपनीला मिळणारे खांब करार करून कमी किंमतीत मिळतील आणि उर्वरित खांब संबंधिताने त्याच्या स्तरावर विकावेत असा विचार करता येईल. कारण कंपनीकडे इन्फ्रा आयपीडीएस आहे, त्यावेळी खांबांची आवश्यकता भासणार आहे. कंपनीकडे कारखान्याची जमिनदेखील आहे. तसेच कंपनीला त्या जमिनीचा वापर नवीन सब स्टेशनसाठी करता येऊ शकेल. तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी.**

## " एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादित "

**(सन- २०११-२०१२)**

**चार - टाळता येण्याजोगे व्याज :— (सेवाकर भरण्यात विलंब झाल्यामुळे कंपनीला रुपये ४२.२५ लाख टाळता येण्याजोगे व्याज भरावे लागले).**

**४.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-१२ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.८ मध्ये **" टाळता येण्याजोगे व्याज "** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादितने (कंपनी) आपली अचल मालमत्ता आपल्या तीन दुय्यम कंपन्यांना प्रति महिना अनुक्रमे रुपये १५०.६८ लाख, रुपये ७९.४६ लाख आणि रुपये ८९.६३ लाख भाडेपट्टावर दिली. वित्तिय कायदा, १९९४ कलम ६७ अन्वये वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे सेवाकर, कंपनीला करपात्र सेवेंवर जसे भाड्याने दिलेली अचल मालमत्तेवर भरावा लागतो. तसेच कलम ७५ प्रमाणे अशा कंपन्याना सेवाकर भरण्यात विलंब झाल्यास व्याज भरावे लागते. आमच्या असे निदर्शनास आले (मार्च, २०१२) की देण्यात आलेली सेवा करपात्र असूनसुद्धा कंपनीने वेळोवेळी सेवाकर भरण्यात दिरंगाई केली. परिणामी सेवाकर अधिकाऱ्यांनी (ऑगस्ट, २०१०) सेवाकर भरण्यात विलंब केल्यामुळे जून, २००८ ते जून, २०१० या कालावधीसाठी व्याज आकारले. कंपनीने ऑक्टोबर, २०१० ते जानेवारी, २०११ या दरम्यान रुपये ४२.२५ लाखांचे व्याज भरले होते.

परिणामी, सेवाकर नियमाच्या तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्यामुळे टाळता येण्याजोगे रुपयें ४२.२५ लाखांचे व्याज भरावे लागले. व्यवस्थापनाने लेखापरिक्षणाचे आक्षेप मान्य करताना (मे, २०१२) म्हटले की, इथून पुढे कंपनी सेवाकर देय वेळेत भरण्याची काळजी घेईल. ही बाब शासनाला कळविण्यात (मे, २०१२) आली होती, त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर, २०१२).

**४.२** याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, व्यावसायिक कारणासाठी भाडेपट्टीवर दिलेल्या स्थावर मालमत्तेवरील भाडेपट्टी सेवाकरासाठी पात्र असते. परंतु, भाडेपट्टी प्राप्त झाल्यानंतर सेवाकर देणे असतो. त्याप्रमाणे दुय्यम कंपन्यांकडून भाडेपट्टी प्राप्त झाल्यानंतर सेवाकर वेळेत भरला जात होता.

परंतु, मे, २००८ पासून सेवाकर कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आली. त्याप्रमाणे, दुय्यम कंपन्यांना दिलेल्या सेवेवरील सेवाकर हा देय (due) किंवा प्राप्त (receipt) यापैकी जे लवकर असेल, त्यावर देय होतो. सदर बाब ही त्यावेळी कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना माहित नव्हती.

सूत्रधारी कंपनीचे सेवाकर लेखापरिक्षण हे सेवाकर अधिकाऱ्यांमार्फत दि. २९ जुलै २०१० व १८ ऑगस्ट २०१० रोजी करण्यात आले. लेखापरिक्षणावेळी सदर बाब हि सेवाकर अधिकाऱ्यांनी कंपनीच्या

[illegible] सेवाकर वेळेत भरण्याची सूत्रधारी कंपनीने काळजी घेतली असून मार्च, [illegible] पासून [illegible] सेवाकर हा देय तारखेच्या आधी वेळेत भरला असून, सहामाही [illegible] करण्यात आले आहे.

४.३ [illegible] शासनाने असे मत व्यक्त केले की, [illegible] अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

४.४ समितीला ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन आणि एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १ सप्टेंबर २०१५ रोजी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव, तसेच एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादितचे संचालक (वित्त) व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ३.८ " टाळता येण्याजोगे व्याज " याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली की, कंपनीच्या दुय्यम कंपन्या (महानिर्मिती, एमएसईडीसीएल आणि एमएसईटीसीएल) सध्या नियमितपणे कंपनीला भाडे भरीत आहेत का आणि तेव्हापासून नियमितपणे सेवा कराचा भरणा केला जात आहे काय, यावर संबंधित विभागीय सचिवांनी खुलासा केला की सन २०११-१२ मध्ये सेवा कराची रक्कम आकारण्यात येणाऱ्या रकमेएवढी भरण्याचे सुरू झाले आहे. पूर्वी प्रत्यक्षात जेवढी रक्कम असेल तेवढा सेवाकर देण्यात येत होता. आकारण्यात येणाऱ्या रकमेवर सेवाकर सुरू झाल्यामुळे आणि त्याबाबत माहीत नसल्यामुळे व्याजाची रक्कम मान्य करावी लागली. सूत्रधारी कंपनीला सर्व कामाचे नियोजन करावे लागते. पद्धत बदलल्यामुळे लक्षात आले की, अजूनतरी काही कंपनीकडे वेगळा मूल्य संकेत नाही. ज्यावेळी भाडे-दर आणि व्याज यांची रक्कम देय असल्याचे लक्षात आले. तेव्हापासून देय असणाऱ्या हिशेबानेच वेळेवर रक्कम अदा करण्यात येत आहे.

तसेच यावेळी सूत्रधारी कंपनीच्या वित्त संचालकांनी समितीस विदित केले की, सेवाकर हा वैधानिक देय होता ज्याप्रमाणे आयकर द्यावा लागतो तसेच सेवाकरही दिलाच पाहिजे. कंपनीला सेवेसाठी सेवा पुरविणाऱ्याला सेवाकर द्यायचा आहे, जमा करायचा आहे, हस्तांतरीत करायचा आहे. पूर्वी सेवाकर निश्चित केलेल्या पावतीवर जमा करण्यात येत होता संबंधितांना माहीत नव्हते की, सुधारणा झाली आहे. देय असणाऱ्या रकमेवरदेखील सेवा पुरविणाऱ्याला सेवाकर देणे जरूरीचे आहे हे सूत्रधारी कंपनीतील संबंधितांच्या लक्षात आले नाही किंवा त्याचे अवबोधन त्यांच्या ध्यानात आले नाही, त्यामुळे उशीर झाला आहे आणि त्यामुळे सेवा पुरविण्याऱ्याने त्यावर व्याज लावले आहे. सूत्रधारी कंपनीकडून ते देखील भरण्यात आले आहे. व ही बाब लक्षात आल्यानंतर मात्र त्यापुढे चूक झालेली नाही. यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, शासनाचे स्पष्टीकरण समाधानकारक नाही. शासनाने चूक मान्य करणे आवश्यक होते.

४.५ **अभिप्राय व शिफारस :-**

भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादितच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.८ " टाळता येण्याजोगे व्याज " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता, साक्षीच्या वेळी असे निदर्शनास आले की, **सेवाकरासंदर्भात सन २००८ मध्ये सुधारणा आली आणि सूत्रधारी कंपनीला सन २०११ मध्ये समजले त्यामुळे ४५ लाख रुपयांचे व्याज देखील सूत्रधारी कंपनीला द्यावे लागले. कंपनीकडे वित्तीय सल्लागार आहेत, कायदे तज्ज्ञ आहेत, कंपनी नफ्यात येण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात येतात तरी देखील सन २००८ ची सुधारणा सूत्रधारी कंपनीला सन २०११ मध्ये ज्ञात होत असेल तर ही बाब अत्यंत चिंताजनक व गंभीर आहे यासंदर्भात समिती सूत्रधारी कंपनीच्या कार्यक्षमतेवर नाराजी व्यक्त करीत आहे. कंपनीकडे पैसे रोखस्वरुपामध्ये आले, ते वेळेवर दिले असते तर रोखस्वरुपामध्ये राहिले नसते. समिती अशी शिफारस करीत आहे की, सन २००८ ते २०११ या कालावधीत सूत्रधारी कंपनीमध्ये कार्यरत असणाऱ्या सेवाकराशी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावा.**

******

## बैठकीचे परिशिष्ट

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक १२ ऑगस्ट २०१५ रोजी दुपारी २.०० वाजता, कक्ष क्रमांक ११०१, एकोणिसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) अॅड. आकाश फुंडकर, वि.स.स.
(३) श्री. मनोहर भोईर, वि.स.स
(४) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(५) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(६) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. राजेश तारवी, उप सचिव.

**महालेखाकार कार्यालय, मुंबई**

१. श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार ( वाणिज्यक )
२. श्री. संतोष खेडकर, वरिष्ठ लेखापरीक्षा अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री. मुकेश खुल्लर, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग.
(२) श्री. बिपिन श्रीमाळी, कार्यकारी व्यवस्थापकीय संचालक, महाजनको.
(३) श्री. जे. के. श्रीनिवासन, संचालक ( वित्त ), महाजनको.
(४) श्री. विजय सिंह, संचालक ( ऑपरेटिव्हज ), महाजनको.
(५) श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक ( प्रकल्प ), महाजनको.
(६) श्री. मनोज रानडे, कार्यकारी संचालक, महाजनको.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-११ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दि. २४ जून २०१५ रोजी कक्ष क्रमांक १९०१, विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता घेण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(३) श्री. द्वारम मल्लीकार्जुन रेड्डी, वि.स.स.
(४) श्री. अमित साटम, वि.स.स.
(५) श्री. भारत भालके, वि.स.स.
(६) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(७) श्री. किरण पावसकर, वि.प.स.
(८) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती).
**महालेखाकार कार्यालय**
श्री. रविकिरण उबाळे, उप महालेखाकार (वाणिज्यिक).

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. मुकेश खुल्लर, प्रधान सचिव, ऊर्जा.
(२) श्री. बिपीन श्रीमाळी, व्यवस्थापकीय संचालक, महाजनको.
(३) श्री. वि. पी. सिंग, संचालक, महाजनको.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित " यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०१५ रोजी दुपारी ०२.०० वाजता कक्ष क्रमांक १९०१, एकोणीसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि. स. स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. मनोहर भोईर, वि. स. स.
(३) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(४) श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.
(५) ॲड. अनिल परब, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.
(३) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती).

**महालेखाकार कार्यालय, मुंबई**
श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार.

**ऊर्जा विभाग, मंत्रालय**
श्री. मुकेश खुल्लर, प्रधान सचिव.

**एम.एस.ई.बी., एच.सी.एल.**
श्रीमती अनुराधा भाटिया, संचालक (वित्त).

**एम.एस.ई.डी.सी.एल., मुंबई**
श्री. ओ. पी. गुप्ता, कार्यकारी संचालक.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-१२ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित " व " एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादित " यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि. स. स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

(४) श्री. मनोहर भोईर, वि. स. स.

(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(६) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

(७) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

(८) श्री. अनंत गाडगीळ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारुप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.